के

# जागर नवरात्रीचा!




## आरती संग्रह

प्र

# गणपतीची आरती

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची | नुरवी पूर्वी प्रेम कृपा जयाची |
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची | कंठी झळके माळ मुक्ताफळाची ||
जय देव जय देव जय मंगलमूर्ती | दर्शनमात्रे मनकामना पुरती || १ ||

रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा | चंदनाची उटी कुंकुमकेशरा |
हिरे जडित मुकुट शोभतो बरा | रुणझुणती नुपुरे चरणी घागरिया || 2 ||

लंबोदर पितांबर फनी वरवंदना | सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना |
दास रामाचा वाट पाहे सदना | संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना |
जय देव जय देव जय मंगलमूर्ती | दर्शनमात्रे मनकामना पुरती || ३ ||

# Ganpatichi Aarti

Sukhkarta Dukhharta Varta Vighnachi I Nurvi Purvi Prem Krupa Jayachi II
Sarvangi Sundar Uti Shendurachi I Kanthi Jhalke Maal Mukataphalaachi II 1 II

Jaidev Jaidev Jai Mangal Murti I Darshan Maatre Mankamana Purti II

Ratnakhachit Phara Tujh Gaurikumra I Chandanaachi Uti Kumkumkeshara I
Hirejadit Mukut Shobhato Bara I Runjhunati Nupure Charani Ghagriya II 2 II

Lambodar Pitaambar Phanivarvandana I Saral Sond Vakratunda Trinayana
Das Ramacha Vat Pahe Sadana I
Sankati Pavave Nirvani Rakshave Survarvandana II 3 II

# देवीची आरती

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी । अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारी।
वारी वारी जन्म मरणांते वारी । हारी पडलो आता संकट निवारी ॥१॥

जय देवी जय देवी महिषासुरमर्दिनी। सुरवर ईश्वर वरदे तारक संजीवनी ॥धृ॥

त्रिभुवनभुवनी पाहता तुज ऐसे नाही । चारी श्रमले परंतु न बोलवे काही।
साही विवाद करिता पडले प्रवाही । ते तू भक्तालागी पावसी लवलाही ॥२॥

प्रसन्न वदने प्रसन्न होती निजदासा । क्लेशांपासूनी सोडवी तोडी भवपाशा।
अंबे तुजवाचून कोण पुरवील आशा । नरहरी तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥३॥

# Durga Devichi Aarti

Durge Durghat Bhari Tujvin Sansari I Anath nathe Ambe Karuna Vistari II
Vari Vari Janma Maranate Vari I Hari Padalo Ata Sankat Nivari II 1 II

Jai Devi Jai Devi Mahishasuramardini I
Suravara Ishwara Varade Taraka Sanjivani II

Tribhuvana Bhuvani Pahata Tuja Aisi Nahi I Chari Shramale Parantu Na Bolve Kahi II
Sahi Vivad Karita Padale Pravahi I Te Tu Bhaktalagi Pavasi Lavalahi II 2 II

Prasanna Vadane Prasanna Hosi Nijadasa I Kleshapasuni Sodavi Todi Bhavapasha II
Ambe Tujvachun Kon Purvila Asha I Narahari Tallina Jhala Padapankajalesha II 3 II

# शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा । वीषें कंठी काळा त्रिनेत्रीं ज्वाळां।।
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा । तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।।१।।

जय देव जय देव जय श्रीशंकरा । आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ।।ध्रु.।।

कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा । आर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा । ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ।।२।।

देवी दैत्यीं सागरमंथन पैं केलें । त्यामाजी जें अवचित हळाहळ उठिलें।
तें त्वां असुरपणे प्राशन केलें । नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें ।।३।।

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी । पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी । रघुकुलतिलक रामदासा अंतरी ।।४।।

# Shankarachi Aarti

Lavathavati Vikrala Brahmandi Mala I Vishe Kanthi Kala Trinetri Jwala
Lavanya Sundara Mastaki Bala I Tethuniya Jala Nirmala Vahe Jhulajhula II 1 II

Jai Deva Jai Deva Jai Shri Shankara I Aarti Ovalu Tuja Karpuragaura II

Karpuragaura Bhola Nayani Vishala I Ardhangi Parvati Sumananchya Mala II
Vibhutiche Udhalana Shitikantha Nila I Aisa Shankar Shobhe Umavelhala II 2 II

Devi Daityi Sagaramanthana Pai Kele I Tyamaji je Avachit Halahala Uthile II
Te Tva Asurapane Prashana Kele I Nilakantha Nama Prasiddha Jhale II 3 II

Vyaghrambara Phanivardhara Sundara Madanari I
Panchanana Manamohana Munijana Sukhakari II
Shatakotiche Beej Vache Uchchari I Raghukulatilaka Ramadasa Antari II 4 II

# श्री दत्ताची आरती

जय देव जय देव जय श्री गुरुदत्ता । आरती ओवाळिता हरली भवचिंता ॥ धृ ॥

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा । त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना । सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना ॥ १ ॥

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त । अभाग्यासी कैची कळेल ही मात ॥
पराही परतली तेथे कैचा हा हेत । जन्ममरणाचाही पुरलासे अंत ॥ २ ॥

दत्त येऊनिया ऊभा ठाकला । सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ॥
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला । जन्ममरणाचा फेरा चुकवीला ॥ ३ ॥

दत्त दत्त ऐसें लागले ध्यान । हरपले मन झाले उन्मन ॥
मी तू पणाची झाली बोळवण । एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥

# Shree Dattachi Aarti

Jay Dev Jay Dev Jay Shri Gurudatta I Aarti Ovalita Harali Bhavachinta II

Trigunatmak Traimurti Datta Ha Jana I Triguni Avatar Trailokyaraana II
Neti Neti Shabda Na Ye Anumana I Suravar Munijan Yogi Samadhi Na Ye Dhyana II 1 II

Sabahya Abhyantari Tu Ek Datta I Abhagyasi kaichi Kalel Hee Maat II
Parahi Paratali Tethye Kaicha Ha Het I Janmamaranachahi Puralase Anta II 2 II

Datta Yeuniya Ubha Thakala I SadBhave Sashtange Pranipat Kela II
Prasanna Houni Aashirvad Didhala I Janmamaranachaha Phera Chukavila II 3 II

Datta Datta Aise Lagale Dhyan I Harapale Mana Zhale Unman II
Mee Tu Panachi Zhali Bolavan I Eka Janardani Shridattadhyana II 4 II

# पांडुरंगाची आरती

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रम्ह आले गा | चरणी वाहे भीमा उध्दरी जगा || १ ||

जय देव जय देव जय पांडुरंगा | रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा || धृ ||

तुळसीमाळा गळां कर ठेवुनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरी लल्लाटी।
देव सुरवर नित्य येती भेटी । गरूड हनुमंत पुढे उभे राहती || २ ||

धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा | सुवर्णाची कमळे वनमाळा गळा |
राई रखुमाबाई राणीया सकळा | ओवाळीती राजा विठोबा सावळा || ३ ||

ओवाळू आरत्या कुरवंडया येती । चंद्रभागेमाजी सोडूनिया देती ।
दिंडया पताका वैष्णव नाचती । पंढरीचा महिमा वर्णावा किती || ४ ||

आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमाजी स्नाने जे करिती ।
दर्शनहेळामात्रेतयां होय मुक्ती । केशवासी नामदेव भावें ओवाळीती || ५ ||

# Pandurangachi Aarti

Yuge athhavis vitevari ubha I Vamangi Rakhumai dise divya shobha I
Pundalikache bheti Parabrahma aale ga I Charani vahe Bhima uddhari jaga II 1 II

Jay deva jay deva jay Panduranga I Rakhumai vallabha
Rai chya vallabha pave jivalaga II

Tulasi maala gala kar thevuni kati I Kaase pitambar kasturi lallati I
Dev suravar nitya yeti bheti I Garud Hanumant pudhe ubhe rahati II 2 II

Dhanya venunaad Anukshetra Pala I Suvarnachi kamale vanmaala gala I
Rai Rakhumabai raniya sakala I Owaliti raja Vithobo savala II 3 II

Ovalu aartya kuravandya yeti I Chandrabhagemaji soduniya deti I
Dindya pataka Vaishnav naachati I Pandharicha mahima varnava kiti II 4 II

Ashadhi Kartiki bhaktajan yeti I Chandrabhagemaji snan je kariti I
Darshan helamatre taya hoy mukti I Keshavasi Namdev bhave owaliti II 5 II

# घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण । डोळ्यांनी पाहिन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंद पूजन । भावे ओवाळिन म्हणे नामा ।।

त्वमेव माता पिता त्वमेव । त्वमेव बन्धु: सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देवदेव ।।

कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा । बुध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।
करोमि यद्यत् सकलं परस्मै । नारायणायेती समर्पयामि ।।

अच्युतं केशवं राम नारायणम् कृष्णदामोदरं वासुदेवं भजे।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभम् जानकीनायकं रामचंद्र भजे ।।

हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ।।

**।। मंगलमूर्ती मोरया ।।   ।। गणपतिबाप्पा मोरया ।।**

# Ghalin Lotangan

Ghalin lotangan vandin charan I Dolyani pahin rup tujhe II
Preme alingan anand pujan I Bhave ovaleen mhane nama II

Twamev mata cha Pita twamev I Twamev bandhusch sakha twamev II
Twamev Vidhya dravinam twamev I Twamev sarwam mam dev dev II

Kayena vacha manasendriye va I Budhyatmana va prakrutiswabhavat II
Karomi yadhyat sakalam parasmai I Narayana eti samarpayami II

Achyutam Keshavam Ramnarayanam I Krushanadamodaram Vasudevam bhaje II
Shridharam Madhavam Gopikavallabham I Janaki nayakam Ramchandra bhaje II

Hare Ram, hare Ram, Ram Ram hare hare I
Hare Krishna hare Krishna, Krishna Krishna hare hare II

**II Mangalmurtee Morya II   II Ganapatibappa Morya II**

# मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् |
ते हं नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा: ||
ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने | नमो वयं वैश्रवणाय कुर्महे
स मे कामान्कामकामाय मह्यम् | कामेश्वरो वैश्रवणो ददातु ||
कुबेराय वैश्रवणाय | महाराजाय नम:
ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं
माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौम: सार्वायुष
आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंता या एकराळिति तदप्येष श्लोकोऽभिगीतो
मरुत: परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति
एकदंतायविद्महे वक्रतुडाय धीमहि तन्नोदंती प्रचोदयात् ||

# Mantra Pushpanjali

Om Yajnena Yajnam Ayajanta Devastani Dharmani Prathamany Asan |
Te Ha Nakam Mahimanah Sachanta Yatra Purve Sadhyah Santi Devah ||
Om Rajadhirajaya Prasahyasahine Namo Vayam Vaishravanaya Kurmahe | Sa Me
Kaman Kamakamaya Mahyam Kameshvaro Vaishravano Dadatu | Kuberaya
Vaishravanaya Maharaja Namah ||
Om Svasti | Samrajyam Bhaujyam Svarajyam Vairajyam Parameshthyam Rajyam
Maharajyamadhipatyamayam Samantaparyayisyatsarvabhaumah Sarvayusha
Antadaparaardhatpruthivyai Samudraparyantaya Ekaraliti ||
Tadapyeshashloko Bhigito Marutah Pariveshtaro Maruttasya Vasan Gruhe |
Avikshitasyakamaprervishvedevaah Sabhaasada Iti
Ekadantaya Vidmahe, Vakratundaya Dhimahi, Tanno Danti Prachodayat. ||

# प्रार्थना

सदा सर्वदा योग तुझा घडावा | तुझे कारणी देह माझा पडावा ||
उपेक्षु नको गुणवंता अनंता | रघुनायका मागणे हेचि आतां ||१||

उपासनेला दृढ चालवावें| भूदेव संताशी सदा नमावें ||
सत्कर्म योगे वय घालवावें | सर्वामुखी मंगल बोलवावें ||२||

कैलासराणा शिव चंद्रमौळी | फणिंद्र माथा मुकुटी झळाळी ||
कारुण्य सिंधू भवदुःखहारी | तुजवीण शंभो मज कोण तारी ||३||

मोरया मोरया मी बाळ तान्हें | तुझीच सेवा करु काय जाणे ||
अन्याय माझे कोट्यानुकोटी | मोरेश्वरा बा तू घाल पोटी ||५||

ज्या ज्या ठिकांणी मन जाय माझे | त्या त्या ठिकांणी निजरूप तुझे ||
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकांणी | तेथे तुझे सदगुरू पाय दोन्ही ||६||

# Prayer

Sada Sarvada Yog Tujha Ghadava | Tujhe Kaarani Deha Majha Padava |
Upekshu Nako Gunavanta Ananta | Raghunayaka Maagane hechi Aata ||

Upasanela Drudh Chalavave | Bhudev Santanshi Sada Namave |
Satkarma Yoge Vay Ghalvave | Sarvamukhi Mangal Bolvave ||

Kailasrana Shiva Chandramouli | Phaneendra Maatha Mukutee Zalaalee |
Kaarunya Sindhu Bhava Dukha Haaree | Tujaveena Shambho Maja Kona Taaree ||

Morya Morya Me Baal Tanhe | Tuzich Seva Karu Kay Jane |
Anyay Maze Kotyanukoti | Moreshwara Ba Tu Ghal Poti ||

Jya Jya Thikani Man Jay Maze | Tya Tya Thikani Nijroop Tuze |
Me Thevito Mastak Jya Thikani | Tethe Tuze Sadguru Paay Donhi ||

उत्सव
भक्तीचा
जागर शक्तीचा !

केवळ
अप्रतिम!